नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २२/०१/२०२५ (बुधवार) सकाळ**

---

## महाराष्ट्र शासनाच्या १०० दिवसाच्या उपक्रम अंतर्गत संपूर्ण देशामध्ये लागू झालेल्या तीन नवीन कायद्याबाबत आयोजित करण्यात आले जनजागृती शिबिर

नागपुर ग्रामीण पोलीस विभागातर्फे महाराष्ट्र शासनाच्या १०० दिवसाच्या उपक्रम अंतर्गत संपूर्ण देशामध्ये लागू झालेल्या तीन नवीन कायद्याबाबत जनजागृती शिबिर आयोजित करण्यात आले असुन सदर मार्गदर्शन शिबीरामध्ये सामान्य जनतेपर्यंत १ जुलै २०२४ पासुन संपूर्ण देशामध्ये लागुन झालेल्या १. **भारतीय न्याय संहिता** , २. **भारतीय नागरिक सुरक्षा संहीता** ,३. **भारतीय साक्ष अधिनियम** या तीन नविन कायदयाबाबत जनजागृती करणे कामी खालील ठिकाणी शिबीर आयोजीत करून मार्गदर्शन करण्यात आले आहे.

**कन्हान उपविभाग :–** दिनांक २१ जानेवारी २०२५ रोजी कन्हान उपविभाग अंतर्गत खालील ठिकाणी नविन कायदे मार्गदर्शन शिबीर घेण्यात आले आहे. सपोनि रविंद्र मस्कर यांनी नवीन तीन कायद्याबाबत सखोल मार्गदर्शन केले.

१.**पोलीस स्टेशन मौदा तहसिल कार्यालय येथील मिटींग हॉल मध्ये** तीन नवीन फौजदारी कायद्याबाबत जनजागृती शिबिर आयोजित करण्यात आले होते. सदर शिबिरामध्ये सामान्य नागरिक आणि पोलीस पाटील उपस्थित होते. २. **पोलीस स्टेशन खापरखेडा** येथे तीन नवीन फौजदारी कायद्याबाबत जनजागृती शिबिर आयोजित करण्यात आले होते. सदर शिबिरामध्ये खापरेखडा येथील नागरिक,पोलीस पाटील आणि पोलीस स्टेशनचे अधिकारी अंमलदार उपस्थित होते.

**सावनेर उपविभागत** :– दिनांक २१ जानेवारी २०२५ रोजी सावनेर उपविभाग अंतर्गत **पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत आयटीआय कॉलेज, सावनेर** येथे तीन नवीन फौजदारी कायद्याबाबत जनजागृती शिबिर आयोजित करण्यात आले होते. सदर शिबिरामध्ये सदर शिबिरामध्ये पोलीस स्टेशन सावनेर चे अधिकारी ,महाविदयालयातील शिक्षक आणि विदयार्थी उपस्थित होते.

**नागपुर उपविभाग :–** दिनांक २२ जानेवारी २०२५ रोजी नागपुर उपविभाग अंतर्गत खालील ठिकाणी नविन कायदे मार्गदर्शन शिबीर घेण्यात आले आहे. सदर कार्यक्रमांमध्ये सपोनि श्री रविंद्र मस्कर यांनी नवीन तीन कायद्याबाबत सखोल मार्गदर्शन केले.

१. **पोलीस स्टेशन बोरी** येथे तीन नवीन फौजदारी कायद्याबाबत जनजागृती शिबिर आयोजित करण्यात आले होते. सदर शिबिरामध्ये बोरी येथील नागरिक,पोलीस पाटील आणि बोरी पोलीस स्टेशनचे अधिकारी अंमलदार उपस्थित होते. २. **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** अंतर्गत **सरस्वती निस्ताने विदयालय,टाकळघाट** येथे तीन नवीन फौजदारी कायद्याबाबत जनजागृती शिबिर आयोजित करण्यात आले होते. सदर शिबिरामध्ये पोलीस स्टेशन एमआयडीसी चे अधिकारी, विदयालयातील शिक्षक आणि विदयार्थी ,पोलीस पाटील तसेच अंगणवाडी सेविका उपस्थित होते. ३. **पोलीस स्टेशन बेला** अंतर्गत **जिवन विकास विदयालय** येथे तीन नवीन फौजदारी कायद्याबाबत जनजागृती शिबिर आयोजित करण्यात आले होते. सदर शिबिरामध्ये महाविदयालयातील शिक्षक आणि विदयार्थी आणि पोलीस पाटील उपस्थित होते.









पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर